जनसामान्यांच्या मनातील आरसा
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | सोमवार
२७.०७.२०२६
# वरुड दर्पण
संपादक - चंद्रकांत भा. भड
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: २६ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
+91 7745067712

## थोडक्यात

### शासकीय जमिनीवरील पात्र घरांना कायदेशीर मान्यता

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***उल्हासनगर*** – शासकीय जमिनीवरील १ जानेवारी २०११ पूर्वीची पात्र निवासी अतिक्रमणे नियमित करण्याच्या प्रक्रियेला आता वेग येणार असून, पात्र नागरिकांना ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत अर्ज करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ५०० चौरस फुटांपर्यंतचे निवासी अतिक्रमण पूर्णपणे विनामूल्य नियमित करण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती आमदार कुमार आयलानी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विधानसभा क्षेत्रस्तरीय आढावा बैठकीत देण्यात आली. त्यामुळे अनेक वर्षांपासून घरांच्या कायदेशीर मान्यतेच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

## प्रधानांच्या राजीनाम्यानंतर आता ए २० पार्टीची स्थापना

### नितीन गडकरींचं मोठं पाऊल, मुंबई हायकोर्टाचाही महत्त्वाचा निर्णय

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*




**नागपूर** – गेल्या काही दिवसांपासून पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याच्या मुद्द्यावरुन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना सोशल मिडीयावरुन प्रचंड ट्रोल केले जात आहे.

पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळले जात असल्याने वाहने बिघडतात, असा आरोप अनेकांनी केला आहे. यावरुन प्रचंड संतापही व्यक्त केला जात आहे. नितीन गडकरी यांच्याकडून त्यांच्या मुलाच्या इथेनॉल कारखान्यासाठी इंधनात इथेनॉल मिसळण्याच्या निर्णयाचे समर्थन केले जात असल्याचा आरोपही करण्यात आला होता. या सगळ्यामुळे नितीन गडकरी यांना सोशल मीडियावरुन प्रचंड ट्रोल केले जात आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आता पुढचा नंबर नितीन गडकरी यांचा असल्याचा दावा अनेक सोशल मिडिया अकाऊंटवरुन केला जात आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा निकाल दिला आहे.

पेट्रोलमध्ये मिसळण्यात येणाऱ्या इथेनॉलच्या मुद्द्यावरुन डीपफेक आणि एआय व्हिडीओंच्या माध्यमातून नितीन गडकरी यांच्याविरोधात बदनामीकारक मजकूर पसरवला जात आहे. याविरोधात नितीन गडकरी हे मेटा, गुगल आणि एक्स यांच्याविरोधात दिवाणी खटला दाखल करु शकतात, असा निवाळा मुंबई उच्च न्यायालयाने दिला.

उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या या याचिकेत, इथेनॉल धोरण आणि ए २० बाबत नितीन गडकरी यांच्याविरोधात पसवरण्यात येणारी चुकीची माहिती सोशल मिडीयावरुन काढण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याच्या निर्णय हा केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयाच्या अखत्यारित येतो. यावर मुंबई उच्च न्यायालयाने नितीन गडकरी यांना कोर्टात दिवाणी खटला दाखल करण्याची परवानगी दिली आहे.

दरम्यान, कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला मिळालेल्या यशानंतर सोशल मीडियावर आणखी एका नव्या पार्टीची एन्ट्री झाली आहे. ए२० जनता पार्टी असं या पार्टीचे नाव आहे. ए२० जनता पार्टीची सर्वात मोठी मागणी म्हणजे देशातील प्रत्येक पेट्रोल पंपावर ए२० पेट्रोलसोबत १००% शुद्ध पेट्रोलही उपलब्ध करून द्यावे.

## सैनिक कल्याणासाठी सरकार कटिबद्ध : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***मुंबई*** – कारगिलच्या शौर्याला अभिवादन; ऑपरेशन सिंदूर, वन रँक वन पेन्शनसह केंद्राच्या निर्णयांचे कौतुक कारगिल वॉर मेमोरियलसाठी ३ कोटींच्या लाईट अँड साऊंड शोची घोषणाकारगिल विजय हा केवळ युद्धातील यशाचा उत्सव नसून भारतीय जवानांच्या अतुलनीय शौर्य, सर्वोच्च बलिदान, समर्पण आणि राष्ट्रभक्तीचे प्रतीक आहे. या शौर्यगाथेमागे उभ्या असलेल्या वीरमाता आणि वीरपत्नींचा सन्मान म्हणजे संपूर्ण राष्ट्राने व्यक्त केलेली कृतज्ञता आहे. राज्य सरकार सैनिक, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी कायम ठामपणे उभे असून सैनिक कल्याणासाठी कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

लोकभवन, मुंबई येथे कारगिल विजय दिनानिमित्त आयोजित वीरसैनिक व वीरपत्नी कृतज्ञता सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी राज्यपाल विष्णूदेव शर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, पर्यटन व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई, व्हाईस ॲडमिरल संजय वातसायन, लेफ्टनंट जनरल धीरेंद्र सिंह कुशवाह, तिन्ही दलांचे वरिष्ठ अधिकारी, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती तसेच वीरसैनिक, वीरमाता, वीरपत्नी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, २६ जुलै हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा दिवस आहे. प्रतिकूल परिस्थितीत भारतीय जवानांनी कारगिलमध्ये मिळवलेला विजय हा भारतीय सैन्याच्या अदम्य शौर्य, त्याग आणि राष्ट्रभक्तीचे जिवंत उदाहरण आहे. कारगिल विजयाचा आनंद साजरा करताना ५२७ वीर जवानांच्या सर्वोच्च बलिदानाचे स्मरण करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या प्रत्येक जवानाने भारतीयांच्या मनात राष्ट्रभक्तीची अखंड ज्योत प्रज्वलित केली. तसेच वीरमाता आणि वीरपत्नींचा त्याग हा देशाचा खरा स्वाभिमान असल्याचे त्यांनी नमूद केले.

## नवविवाहित दाम्पत्याचा अपघातात मृत्यू

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***नाशिक*** – कळवण तालुक्यातील पिळकोस फाट्याजवळ रविवारी सकाळी सुमारे सव्वा आठच्या सुमारास नवविवाहित पती-पत्नीचा भीषण अपघात झाला.

खामखेडा येथून पिळकोसच्या दिशेने जाणाऱ्या मॅक्झिमो प्रवासी वाहनाची आणि कळवणकडून सटाण्याच्या दिशेने दुचाकीवरून जात असलेल्या तिघांची समोरासमोर जोरदार धडक झाली.

या अपघातात दिनेश गावित, त्यांची पत्नी कीर्ती गावित आणि पत्नीची बहीण त्रिशा गावित गंभीर जखमी झाले. तिघांनाही तातडीने कळवण उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

त्यानंतर पुढील उपचारासाठी नाशिक जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान दिनेश गावित आणि कीर्ती गावित यांचा मृत्यू झाला. तर त्रिशा गावित यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

## गँगरेप प्रकरणातील मुख्य आरोपीला जामीन

### उच्च न्यायालय नागपूर कडून मोठा निर्णय

### ॲड.सुमित गंदे अन ॲड.संदेश मेश्राम यांचा युक्तीवाद ठरला प्रभावी

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*







**वरुड** –जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालया अंतर्गत येत असलेल्या शेंदुरजनाघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बहुचर्चित सामूहिक अत्याचार प्रकरणातील संशयित आरोपी महेश रामदास वाघमारे याला नागपूर उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला असून, आरोपीच्या वतीने ॲड.सुमित गंदे अन ॲड.संदेश मेश्राम यांनी केलेला जोरदार कायदेशीर युक्तीवाद या निर्णयात अत्यंत प्रभावी ठरला आहे. वरुड येथील न्यायालयाने जामीन फेटाळल्यानंतर वकिलांनी उच्च न्यायालयात बाजू मांडून हा मोठा दिलासा मिळवून दिला.

जामगाव महेंद्री येथील २३ वर्षीय युवतीच्या तक्रारीवरुन २९ जानेवारी २०२४ रोजी शेंदुरजनाघाट पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता. या प्रकरणात मालखेड येथील महेश रामदास वाघमारे, पिंटू भाऊराव हरले, रमेश मन्साराम भलावी, ईसमाईल खा सरवर खा पठाण आणि नितीन ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले होते. पोलिसांनी या तक्रारीवरून तपास सुरू केला होता.

या प्रकरणाची सुनावणी वरुड येथील सत्र न्यायालयात झाली असता न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला होता. यानंतर आरोपीच्या वतीने ॲड.सुमित गंदे आणि ॲड.संदेश मेश्राम यांनी नागपूर उच्च न्यायालयात दाद मागितली. उच्च न्यायालयात वकिलांनी मांडलेले मुद्दे आणि कायदेशीर युक्तीवाद विचारात घेऊन न्यायालयाने महेश वाघमारे याला जामीन मंजूर करण्याचा आदेश दिला.

**न्यायालयाचा जामीन निर्णय**

“ शेंदुरजनाघाट पोलीस ठाण्यातील सामूहिक अत्याचार प्रकरणातील आरोपी महेश वाघमारे याला वरुड न्यायालयाने जामीन नाकारला होता. त्यानंतर ॲड.सुमित गंदे आणि ॲड.संदेश मेश्राम यांच्या प्रभावी यक्तीवादामुळे नागपूर उच्च न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला.

## वर्ध्यात दहशत! १० गावांत हाय अलर्ट जारी

### वनविभाग ॲक्शन मोडमध्ये

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



***वर्धा***– महाराष्ट्र आणि देशपातळीवर वन्यजीवांच्या वाढत्या वावरामुळे मानवी वस्त्यांवर आणि शेती परिसरांवर संकट ओढवल्याचे अनेकदा पाहायला मिळते. सध्या वर्धा जिल्ह्यातून एक अत्यंत महत्त्वाची आणि धास्ती भरवणारी बातमी समोर येत आहे. जिल्ह्यातील वाठोडा शिवारात एका तरुण नर वाघाचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी आणि अनुचित प्रकार घडू नये म्हणून प्रादेशिक वनविभाग पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आला असून, परिसरातील तब्बल १० गावांमध्ये खबरदारीचा इशारा (हाय अलर्ट) जारी करण्यात आला आहे. १० गावांवर वाघाचे संकट, प्रशासनाकडून सतर्कता वनविभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, हा मुक्तसंचार करणारा वाघ अंदाजे ३ वर्ष वयोगटातील तरुण नर आहे. त्याच्या सुरक्षिततेसाठी आणि परिसरातील नागरिकांच्या संरक्षणासाठी प्रादेशिक वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी दिवस-रात्र परिसरातील जंगल पिंजून काढत आहेत. अत्याधुनिक यंत्रणेद्वारे आणि प्रत्यक्ष गस्तीव्दारे या वाघाच्या प्रत्येक हालचालीवर अत्यंत बारीक लक्ष ठेवले जात आहे.



उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त

# केदारेश्वर स्मशानभुमीमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)





**वरुड** – राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जनसेवा सप्ताह अंतर्गत 'निसर्ग सेवा' या उपक्रम अंतर्गत केदारेश्वर स्मशानभुमी वरुड येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवित वृक्षारोपण केले.

यावेळी माजी आमदार देवेंद्र भुयार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते प्रमोद पाटील कोहळे, तालुकाध्यक्ष विजय वडस्कर, नगरसेवक तुषार देशमुख, अन्सार बेग, मनिषा उईके, युवराज आंडे, शहर प्रमुख शाम आजनकर, अमित देवते, राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरुड–मोर्शी महिला प्रमुख सविता काळे, महिला शहर प्रमुख रसिका बरडे, रोशनी तडस, राहुल बेलसरे, निखिल बनसोड, नितीन आगरकर, संजू डाफे, सबीर खान, जगबीर सिंग भावे, सतीश सातनकर, राजू शिरस्कर, सोमकुंवर सर, चेतन सालोडे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी वृक्षारोपण करुन पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावुन त्याचे संगोपन करावे, असे आवाहन करण्यात आले. जनसेवा सप्ताहाच्या माध्यमातून राबविण्यात येणारे सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत असून, भविष्यातही अशा उपक्रमांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले. उपस्थित सर्व मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे 'निसर्ग सेवा' हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

जिल्हात मतदार यादीचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण अभियानात

# १०० टक्के उदिदष्ट पार करणाऱ्या शिक्षकांचा गौरव



■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

***शेंदुरजनाघाट*** – जिल्हात मतदार यादीचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण (एस.आय.आर.) अभियानात उदिदष्ट १०० टक्के पार करणाऱ्या शेंदुरजनाघाट नगर परिषद येथील शाळा क्र.१ चे शिक्षक तथा बी.एल.ओ.संदीप कोकाटे, शाळा क्र.२ च्या शिक्षिका रीना गिरी, शाळा क्र.३ च्या शिक्षिका नेहा सुपले व शाळा क्र.४ च्या शिक्षिका भावना मेंढे त्यांचे सहाय्यक यांच्या प्रशासनाच्या वतीने नगरपरिषद शाळेमध्ये कौशिक पांडे यांचे कडून रोपटं देऊंन सन्मान करण्यात आला.

यावेळी कौशिक पांडे, शाळा क्र.२ च्या मुख्याध्यापिका किर्तीमाला धुर्वे, मंडळ अधिकारी देवानंद मेश्राम, पर्यवेक्षक अंकुश राऊत, सौरभ आगे, कोतवाल ज्ञानेश्वर कवडे, शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी यांची उपस्थिती होते.

जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांचे सुचने नुसार व उपविभागीय अधिकारी मोर्शी, तहसीलदार रामदास शेळके यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि आढावा यामुळेच आपण १०० टक्के काम पूर्ण करण्याचे लक्ष गाठू शकलो असल्याचे शिक्षक संदीप कोकाटे यांनी सांगितले.सोबतच रीना गिरी, नेहा सुपले, भावना मेंढे बी.एल.ओ.व त्यांची सहय्यक यांनी सुध्दा १०० टक्के काम पूर्ण केले.

सदर कार्यक्रमाला नगरपरिषदे शाळेचे सर्व शिक्षक, पर्यवेक्षक अंकुश राउत, सौरभ आगे, नोडल अधिकारी तथा मंडळ अधिकारी देवानंद मेश्राम, कोतवाल ज्ञानेश्वर कवडे आदी उपस्थित होते.

डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथे

# आषाढी एकादशी निमित्त पालखी सोहळा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथे आषाढी एकादशी निमित्य वरुड शहरातुन विठ्ठलाची पालखी काढण्यात आली. जय हरी विठ्ठल श्री हरी विठ्ठल चा गजर करीत प्रत्यक्ष पंढरीचे व मराठमोळ्या संस्कृतीची दर्शन शहरवासीयांना शाळेतील विद्यार्थ्यांनी करुन दिले. सर्वप्रथम पालखीचे पूजन मुख्याध्यापिका नीता चिमोटे व आदर्श मराठी प्रायमरीचे मुख्याध्यापक नितेश वाघमारे तसेच प्रमुख अतिथी डॉ.मीना बंदे, माजी नगराध्यक्ष जया नेरकर व मीना खंडेलवाल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी इयत्ता दहावी व तिसरी, चौथीच्या विद्यार्थिनींनी सुंदर नृत्य सादर केले. शाळेच्या प्रांगणातून निघालेली पालखी शहरातील जयंट्स चौक, पार्डी चौक, केदार चौक पोहचली तेथे नृत्य सादरीकरण केले. इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींचे लेझीम पथक व शिस्तबद्ध पावली करत चाललेली पाहून शहरवासीयांना एक अनोखी अनुभूती करुन दिली. या पालखी सोहळ्यात शाळेतील विद्यार्थी विठ्ठलाची वेशभूषा व वारकऱ्यांच्या वेषामध्ये हातात टाळ व कपाळी टिळा लावून, झेंडे घेऊन सहभागी होते. या कार्यक्रमाचे संचालन विपुल पाचघरे व लीना पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# केवळ भाषिक उल्लेखांमुळे आदिवासी ओळख बदलत नाही

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



***मुंबई*** – केवळ भाषिक उल्लेखांमुळे आदिवासी ओळख बदलत नाही, असे निरक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिलाय.

'तेलगू मन्नेवार' किंवा 'हिंदू मन्नेवार' केवळ भाषिक आणि प्रादेशिक संज्ञा आहे. ती वेगळी जात नाही असेही नागपूर खंडपीठाने म्हटलं आहे. अकोल्यातील १७ वर्षीय सक्षम पट्टीचा 'मन्नेवार' अनुसूचित जमातीचा दावा मंजूर करत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिलाय.


दरम्यान, अमरावती जात पडताळणी समितीने सक्षमचा दावा यापूर्वी फेटाळला होता. यावर सक्षम पट्टीचा न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली असता समितीचा आदेश रद्द करत ६ आठवड्यांत वैधता प्रमाणपत्र देण्याचे निर्देश नागपूर खंडपीठाने दिले आहे.

तर 'तेलगू मन्नेवार', 'हिंदू मन्नेवार', 'मन्नेवार' आणि 'तेलगू' उल्लेखावरून होणारा समितीचा दावा फेटाळला होता. परिणामी, उच्च न्यायालयाचा नागपुर खंडपीठाने समितीचा निष्कर्ष कायद्याच्या दृष्टीने चुकीचा आणि पूर्वग्रहदूषित असल्याचे मत नोंदवत हा महत्त्वपूर्ण निर्णय दिलाय.

'तेलगू मन्नेवार' किंवा 'हिंदू मन्नेवार' केवळ भाषिक आणि प्रादेशिक संज्ञा, वेगळी जात नाही दरम्यान, 'मन्नेवार'पूर्वी जोडलेले 'तेलगू', 'तेलंगी', 'हिंदू' भाषा, प्रदेश किंवा धर्म दर्शवणारे शब्द आहेत.

# वासुदेवराव मेंढे यांचे निधन

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)



***हिवरखेड*** – येथील किराणा, धान्य, कापड व्यापारी गोवर्धन व विजय मेंढे यांचे वडील वासुदेवराव प. मेंढे यांचे नुकतेच वयाच्या ८९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचेवर निर्मिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.

त्याचे मागे पत्नी, ३ मुले, सुना, १ मुलगी, जावई, नातू व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

जि.प.प्राथ.कन्या शाळा येथे

# वर्ग पडताळणी करीता मान्यवरांच्या भेटी



■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

***हिवरखेड*** – जि.प.प्राथ.कन्या शाळा येथे क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य गुणगौरव पुरस्कार करीता वर्ग पडताळणी करीता ज्येष्ठ अधिव्याख्याता पवन मानकर, गट शिक्षणाधिकारी नंदकिशोर खरात, सहाय्यक शिक्षक बंड तसेच कुशकुमार पाथरे यांनी भेट दिली.

वर्ग चौथीच्या विद्यार्थ्यांची गणित या विषयाची चाचणी घेण्यात आली. वर्गाशी संबंधित संपूर्ण रेकॉर्ड तपासण्यात आले. सर्व मान्यवरांनी परसबागेची पाहणी केली. शाळेत सुरु असलेल्या उपक्रमांची माहिती मुख्याध्यापिका माटे यांनी दिली. सुरु असलेल्या कामकाजाचे कौतुक केले आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेच्या वतीने पाहुण्यांचे शाल आणि बुके देऊन स्वागत करण्यात आले. अनिता पाटील यांनी सर्व पाहुण्यांचे आभार मानले.

# 'न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूल'मध्ये आषाढी एकादशी

## विठूनामाच्या गजराने दुमदुमला परिसर

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)







**वरुड** – स्थानिक न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे आज 'आषाढी एकादशी'चा पावन उत्सव अत्यंत सुंदर, भक्तीमय आणि उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. विठूनामाचा गजर आणि टाळ–मृदंगाच्या नादाने संपूर्ण शाळा परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता. या कार्यक्रमात शाळेतील लहानग्या विद्यार्थ्यांनी दाखवलेला उत्साह सर्वांचेच लक्ष वेधून घेणारा ठरला.

**बालगोपाळांनी साकारले विठ्ठल–रुख्मिणीचे रूप**

या भक्तीमय सोहळ्यामध्ये नर्सरी ते इयत्ता तिसरीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने भाग घेतला. विशेष म्हणजे अनेक चिमुरडे विद्यार्थी वारकरी स्त्रिया आणि वारकरी पुरुषांच्या पारंपारिक वेशभूषेत शाळेत आले होते. कपाळावर बुक्का, गळ्यात तुळशीची माळ आणि हातात टाळ घेतलेले हे लहानगे वारकरी अत्यंत लोभसवाणे दिसत होते तर काही विद्यार्थ्यांनी चक्क भगवान श्रीकृष्ण, विठ्ठल आणि माता रुख्मिणीचे सुंदर रूप साकारले होते. या बालवारकऱ्यांच्या रुपाने साक्षात पंढरपूर वरुड नगरीत अवतरल्याचा भास होत होता.

**मुख्याध्यापिकांच्या हस्ते विठ्ठल पूजन**

कार्यक्रमाची सुरुवात अतिशय भक्तीभावाने झाली. मुख्याध्यापिका कोमल पांडव यांच्या हस्ते भगवान विठ्ठल आणि माऊलींच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी विठ्ठलाची आरती व भजने म्हटली. टाळांच्या गजरात आणि 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम' या जयघोषाने संपूर्ण वातावरण चैतन्यमय झाले होते.

**शिक्षकांचे नियोजन आणि पालकांचा उदंड प्रतिसाद**

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाची पूर्वतयारी अतिशय उत्तम रीतीने केली होती. सुंदर सजावट आणि सुयोग्य नियोजनामुळे कार्यक्रमाची शोभा आणखीनच वाढली. या संपूर्ण सोहळ्याला पालकांनी खूप मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला उत्तम प्रतिसाद दिला. आपल्या लहानग्यांना वारकऱ्यांच्या रूपात पाहून पालक भारावून गेले होते. न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूलमध्ये पार पडलेला हा आषाढी एकादशीचा कार्यक्रम अत्यंत सुंदर, आनंदी आणि यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# संपादकीय

**विचार सकारात्मक असतील तर परिणामही सकारात्मकच असतो**

## कोकणच्या कॅलिफोर्नियाच्या 'गजाली' आणि विकासाचा पेच

राजकीय विरोध हा लोकशाहीचा आत्मा आहे. सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे, धोरणांवर टीका करणे आणि जनहिताच्या दृष्टीने पर्यायी भूमिका मांडणे हे विरोधकांचे कर्तव्यच आहे. मात्र, राजकीय विरोध आणि विकासाच्या प्रत्येक उपक्रमाला अडथळा निर्माण करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. दुर्दैवाने, कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये अनेक वर्षांपासून कोणत्याही मोठ्या विकास प्रकल्पाबाबत अशीच परिस्थिती पाहायला मिळते. एखाद्या प्रकल्पाची केवळ चर्चा सुरू झाली तरी त्याविरोधात आंदोलने, अफवा, राजकीय भूमिका आणि सामाजिक मतभेद उभे राहतात. परिणामी, विकासाची संधी अनेकदा हातातून निसटते. कोकणाला निसर्गाने भरभरून दिले आहे. अथांग समुद्रकिनारा, डोंगररांगा, सुपीक जमीन, समृद्ध जैवविविधता, पर्यटनासाठी पोषक वातावरण आणि मेहनती माणसे ही या प्रदेशाची खरी ताकद आहे. म्हणूनच अनेक तज्ज्ञ कोकणाला भारताचे 'कॅलिफोर्निया' होण्याची क्षमता असल्याचे सांगतात. जसे अमेरिकेतील कॅलिफोर्निया कृषी, पर्यटन, तंत्रज्ञान आणि उद्योग यांचे प्रभावी केंद्र बनले, त्याचप्रमाणे कोकणातही पर्यटन, मत्स्यव्यवसाय, कृषी प्रक्रिया उद्योग, बंदरे, हरित ऊर्जा आणि माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठी झेप घेण्याची क्षमता आहे. मात्र, ही क्षमता प्रत्यक्षात आणण्यासाठी विकासाचे प्रकल्प आवश्यक आहेत. गेल्या काही दशकांत कोकणात अनेक मोठ्या प्रकल्पांची घोषणा झाली. जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प, नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्प, विविध औद्योगिक वसाहती, बंदर विकास, महामार्ग, रेल्वे विस्तार आणि इतर अनेक योजनांवर मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. या प्रकल्पांपैकी काहींना स्थानिकांचा योग्य आणि रास्त विरोध होता. कारण जमीन संपादन, पर्यावरणीय परिणाम, विस्थापन आणि स्थानिकांच्या हक्कांबाबत अनेक प्रश्न होते. त्या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यकच होते. परंतु काही वेळा कोणत्याही प्रकारचा संवाद न साधता किंवा वस्तुस्थिती समजून न घेता प्रत्येक प्रकल्पाला विरोध करण्याची मानसिकता तयार झाली. ही मानसिकता कोकणाच्या भविष्यासाठी चिंतेची बाब आहे. विकास म्हणजे केवळ कारखाने उभारणे किंवा मोठे उद्योग आणणे नव्हे. विकास म्हणजे रोजगार निर्माण करणे, पायाभूत सुविधा उभारणे, शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा वाढवणे, पर्यटनाला चालना देणे आणि स्थानिक अर्थव्यवस्था सक्षम करणे. आज कोकणातील हजारो तरुण रोजगाराच्या शोधात मुंबई, पुणे किंवा परदेशात जात आहेत. गावातील घरे बंद होत आहेत, शेतीकडे दुर्लक्ष होत आहे आणि अनेक गावांची लोकसंख्या घटत आहे. जर स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या, तर स्थलांतर कमी होईल आणि कोकणातील अर्थचक्र अधिक मजबूत होईल. अर्थात, विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा बळी देणेही योग्य नाही. कोकणाची खरी ओळख त्याचा निसर्ग आहे. त्यामुळे कोणताही प्रकल्प राबविताना पर्यावरणीय संतुलन, स्थानिकांचे हित, पारदर्शकता आणि वैज्ञानिक अभ्यास यांना प्राधान्य दिले पाहिजे. स्थानिक नागरिकांचा विश्वास जिंकणे, त्यांना योग्य मोबदला देणे, पुनर्वसनाची प्रभावी व्यवस्था करणे आणि रोजगारात स्थानिकांना प्राधान्य देणे या गोष्टी अत्यावश्यक आहेत. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल साधणे हीच खरी शाश्वत विकासाची दिशा आहे.




# कृषी कराराचे वास्तव!

आपल्या लोकांच्या रोजीरोटीपेक्षा परदेशी राष्ट्राध्यक्षाच्या मताला अधिक महत्त्व दिल्यामुळे त्याची किंमत भारतातील शेतकरी आणि सामान्य ग्राहकांना चुकवावी लागणार आहे.

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने २० फेब्रुवारी २०२६ रोजी ६-३ च्या निकालात जाहीर केले की राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना जगभरावर टॅरीफ लादण्याचा कायदेशीर अधिकारच नव्हता. हा अधिकार केवळ अमेरिकन काँग्रेसकडे आहे. भारताच्या साऱ्या सवलतींचा आधार, फेब्रुवारीपूर्वी करार उरकण्याची घाई, दंडात्मक टॅरीफची भीती ती धमकी होती जिला अमेरिकेच्या न्यायालयानेच बेकायदेशीर आणि घटनाबाह्य ठरवले. जर भारत सरकारने ताकदीच्या स्थितीतून भाव केला असता, तर टॅरीफचे संकट उद्भवले नसते. ट्रम्प यांच्याकडून कराराची घोषणा करवून घेण्याची एवढी घाई का होती? आपल्या लोकांच्या रोजीरोटीपेक्षा परदेशी राष्ट्राध्यक्षाच्या मताला महत्त्व दिल्यामुळे त्याची किंमत भारतातील शेतकरी आणि सामान्य ग्राहकांना चुकवावी लागणार आहे.

मध्य प्रदेशातील काही जिल्ह्यांत सोयाबीन पीक चांगले आले, तरीही पोती रिकामी आहेत. कारण आजच्या भावात विकणे हे पीक सडू देण्यापेक्षाही मोठा पराभव वाटतो. करारानंतर सरपंचांनी लाऊडस्पीकरवर सांगितले, अमेरिका आता आपला मित्र आहे, भाव वाढतील. तो ९ फेब्रुवारीचा दिवस होता. १५ फेब्रुवारीपर्यंत दलाल ३,६०० देत होता. मागच्या वर्षी हाच भाव ४,२०० होता.

४० लाख शेतकरी कुटुंबे सोयाबीनवर अवलंबून आहेत. मध्य प्रदेशात ४८% आणि महाराष्ट्रात ३२% उत्पादन होते. सरकार म्हणते, अमेरिकन सोयाबीनसाठी दरवाजा बंद आहे. तांत्रिकदृष्ट्या खरे. पण लढाई समोरच्या दरवाजातून जिंकली जात नाही. कराराने दोन चोरवाटा उघडल्या आहेत. त्यापैकी १) सोयाबीन तेल : स्वस्त, सबसिडीयुक्त अमेरिकन तेल आपल्या बाजारात घुसेल. २) डिस्टिलर्स ग्रेन : अमेरिकन इथेनॉल उद्योगाचे उपउत्पादन असून जे पशुखाद्यात सोया पेंडीची जागा घेईल. भारतीय सोयाबीनपासून दोन गोष्टी बनतात. स्वयंपाकासाठी तेल आणि जनावरांसाठी पेंड. दोन्हींच्या बाजारपेठांवर एकाच वेळी घाव घातला गेला आहे.

पशुखाद्य उत्पादकांची संघटना उङऋचअ चा अंदाज आहे की, तीन वर्षांत २५ लाख टन भारतीय सोया पेंड अमेरिकन ऊॠऋड (डिस्टिलर्स ग्रेन) मुळे विस्थापित होऊ शकते- म्हणजे ३१ लाख टन सोयाबीन, आपल्या एकूण पिकाचा २५% हिस्सा वाया जाणार आहे. प्रति हेक्टर तोटा सुमारे ?१७,००० होईल. दोन हेक्टरवाल्या शेतकरी कुटुंबाचा तोटा ?३५,००० प्रति हंगाम म्हणजे कुटुंबाच्या वार्षिक कमाईचा एक चतुर्थांश ते एक तृतीयांश हिस्सा साफ!

**रक्ताने माखलेले 'पांढरे सोने'**

२०१९ मध्ये जेव्हा कापसाचा भाव बियाणे खताच्या उधारीपेक्षाही खाली घसरला, तेव्हा अनेक शेतकऱ्यांनी कीटकनाशक पिऊन जीवन संपवले. कापूस शेतकऱ्याला एक नव्हे, दोन ठोसे मारले गेले: पहिला ठोसा (१९ ऑगस्ट २०२५) : केंद्र सरकारने कापसावरील ११% आयात शुल्क रद्द केले. वस्त्रोद्योगाच्या मदतीच्या नावाखाली परदेशी कंपन्यांना बाजारपेठा खुल्या केल्या. दुसरा ठोसा (९ फेब्रुवारी २०२६) : भारत-अमेरिका व्यापार करार निर्यात वाढवण्याच्या गप्पा, पण देशांतर्गत भावाचा सत्यानाश झाला. २+५०% सूत्रानुसार (हमीभाव) असायला हवा १०,०७५ प्रति क्विंटल. शेतकऱ्याला मिळणारा भाव : ६,०००-७,००० प्रति क्विंटल कापूस. शेतकऱ्यांची एकूण लूट : ३६,५१८ कोटींहून अधिक उउख चा अंदाजित तोटा : ?१२,४१६ कोटी. विदर्भात दररोज ९ शेतकरी आणि संपूर्ण देशात दररोज ३१ शेतकरी आत्महत्या करतात. अर्थशास्त्रज्ञ ३६,५१८ कोटींच्या तोट्याला 'बाजार सुधारणा' म्हणतात. कुटुंबे दररोजच्या ३१ मृत्यूंना काय म्हणतील- प्रलय.

८ कोटी कुटुंबांचा प्रश्न भारत जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश आहे. २०२३-२४ मध्ये २३९.३ दशलक्ष टन दूध उत्पादन झाले. ही कोणत्या कॉर्पोरेटची नव्हे, ८ कोटी दूध उत्पादक कुटुंबांची किमया आहे, ज्यांत ७०% महिला आहेत. आपली ताकद सहकारी मॉडेल आहे. सरकार म्हणते, करारातून डेअरी बाहेर आहे. पण भिंतीला पहिला तडा गेला आहे. जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक असूनही भारत २०२५ मध्ये अंदाजे २३,००० टन व्हे प्रोटीन आयात करत आहे. (व्हे प्रोटीन म्हणजे दुधातून पनीर वेगळे काढल्यावर शिल्लक राहणारा द्रव पदार्थ) मुख्यतः अमेरिका-युरोपमधून आणि यामागे 'चॉकलेट कनेक्शन' आहे. अमेरिका चॉकलेट व स्पोर्ट्स-न्यूट्रिशन बाजाराच्या बहाण्याने भारताचे डेअरी क्षेत्र संपवण्यासाठी दबाव आणत आहे. सुरुवात व्हे प्रोटीनपासून होईल, मग मिल्क पावडर, मग उरलेली उत्पादने. भारताकडे भाव स्थिर ठेवण्यासाठी २ लाख टनांहून अधिक मिल्क पावडरचा साठा आहे स्वस्त, सबसिडीयुक्त आयातीचा महापूर या संरक्षक-कवचांना निरर्थक करून टाकेल. जी आज आयात आहे, ती उद्या दुधाचा महापूर बनून आपल्या गावांची रोजीरोटी बुडवू शकते.

२०२३-२४ मध्ये दूध उत्पादन २३९.३ दशलक्ष टन होते. ८ कोटी शेतकरी, ७०% महिला पशुपालक आहेत. डेअरी बाजाराचे मूल्य १९ लाख कोटी असून २०२५ मध्ये प्रोटीन आयात २३,००० टन करण्यात आली. (२०२४ पेक्षा २०% अधिक) त्यामुळे भारत मिल्क पावडरचा सर्वात मोठा आयातदार बनला. एकट्या महाराष्ट्रात ५० हजार टन मिल्क पावडरची आयात करण्यात आली.

लुटीची किंमत : फ्लिपकार्ट-वॉलमार्टने ?१ मध्ये अर्धा लिटर दूध देण्याची योजना आणली आहे. अमेरिकेत वॉलमार्टच्या ग्रॉसरी विस्ताराने ३०,००० हून अधिक स्वतंत्र किराणा दुकाने बंद पाडली. पद्धत सरळ होती. इतका काळ भाव पाडा की स्पर्धक संपून जावेत, मग एकाधिकार गाजवून भाव वाढवा. आता तोच खेळ देशी थाटात भारतात पोहोचला आहे. निशाण्यावर केवळ गल्लीतले किराणा दुकान नाहीत, तर आपली सहकारी चळवळ आहे आणि हत्यार आहे दूध.. ८ कोटी शेतकऱ्यांच्या रोजीरोटीचा सवाल आहे. ज्यात ७०% महिला आहेत. मार्च २०२६ मध्ये वॉलमार्ट-समर्थित फ्लिपकार्टने कर्नाटकात 'ग्राहक जोडो अभियान' सुरू केले. ऑफर : अर्धा लिटर दूध ?१ मध्ये. हा आकडा मनात खोल उतरू द्या. दूध उत्पादक पशुपालक पहाटे ३ वाजता उठतात. ७ वाजेपर्यंत त्यांचे दूध सहकारी संस्थेला ?४० प्रति लिटरने विकले जाते. दुपारपर्यंत तेच दूध फ्लिपकार्टवर ?१ ला विकले जात असते, हा भांडवलवाद नाही. ही उपभोक्तावादाचा बुरखा पांघरलेली शिकार आहे. आकडे जे प्रत्येक जागरूक नागरिकाला हादरवून सोडतील, शेतकऱ्याकडून खरेदी मूल्य ?३८-४० प्रति लिटर. फ्लिपकार्टचे प्रचार मूल्य ?१ प्रति अर्धा लिटर (खरेदी खर्चाच्या ९७.५% खाली) प्रचारात विकले गेलेले डेअरी उत्पादन. एकूण दूध १४.५ लाख लिटर जर गृहीत धरले तर दूध उत्पादक शेतकऱ्यांचा तोटा किती होईल. यामुळे नाइलाजाने पशुपालक आपली जनावरे विकतील. कारण दैनंदिन विक्रीतील घट ४०-५० हजार लिटर असेल. फ्लिपकार्टसारख्या कंपन्यांच्या प्रचार यंत्रणेपुढे सामान्य पशुपालक दूध उत्पादक हतबल होईल. पुढे गावागावात दूध उत्पादन बंद झाल्यावर कंपन्या आपल्या दुधाची किंमत वाढवतील. (उदा- आपल्याकडे बीएसएनएल बंद पाडून जिओने सुरुवातीला कमी किमतीचे रिचार्ज आणले. आज जिओच्या रिचार्जची किंमत आठवून पाहा.)

फ्लिपकार्टच्या या जाहिरात अभियानावरील कथित खर्च सुमारे २,००० कोटी आणि संकटात ८ कोटी डेअरी शेतकऱ्यांची उपजीविका असेल. फ्लिपकार्टचे 'मर्यादित प्रचार अभियान' म्हणजे शेतकऱ्यांच्या पैशातून आणि पिढ्यांच्या मेहनतीतून उभ्या राहिलेल्या सहकारी संस्थांची कायमची हानी होईल. जो भाव सहकारी संस्थेला बंद पडण्यास भाग पाडतो, त्यात 'मर्यादित' असे काहीही असत नाही, कारण बड्या कंपन्या सर्व काही 'अमर्यादित' पद्धतीने ताबा घेण्यास इच्छुक असतात.




# शर्यत अजून संपलेली नाही

आज महिलांनी शिक्षण, उद्योग, प्रशासन आणि विज्ञान अशा प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली. तरीही सर्वोच्च नेतृत्वाच्या पदांपर्यंत पोहोचताना अद्यापही अनेक अदृश्य अडथळे उभे राहतात. संधीची समानता, गुणवत्तेचा सन्मान आणि निर्णय घेणाऱ्यांची मानसिकता या तीन गोष्टींची खरी परीक्षा याच टप्प्यावर होते. माजी पेप्सीको अध्यक्षा इंद्रा नूयी यांच्या अलीकडील वक्तव्याने हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आणला. महिलांना संधी मिळवण्यासाठी अजूनही लढावंच लागतं? या प्रश्नाचं उत्तर शोधताना सुधा मूर्ती यांच्या आयुष्यातील एक प्रसंग आपल्याला सांगून जातो की, शर्यत महिलांच्या क्षमतेची नसून त्यांना समान संधी देणाऱ्या समाजाच्या मानसिकतेची आहे आणि ती शर्यत अजून संपलेली नाही.

माजी पेप्सीको अध्यक्षा इंद्रा नूयी यांनी अमेरिकेतील एका कार्यक्रमात माजी अमेरिकन परराष्ट्रमंत्री कॉन्डोलीझ्झा रईस यांच्याशी संवाद साधताना असे वक्तव्य केले की, ङ्गमी अमेरिकेबाहेरील कोणत्याही देशात, भारतातसुद्धा, सीईओ होऊ शकले नसते. कारण अमेरिकेची व्यवस्था गुणवत्तेला प्राधान्य देते. येथे मार्गदर्शक तुम्ही पुरुष आहात की महिला, तुमची जात, वंश किंवा पार्श्वभूमी काय आहे, यापेक्षा तुमच्यातील गुणवत्ता आणि क्षमता महत्त्वाची मानतात. या वक्तव्यानंतर भारतात मोठी चर्चा रंगली. काहींनी नूयी यांच्या मताशी सहमती दर्शवत भारतात अजूनही महिलांना सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचताना अनेक संरचनात्मक अडथळ्यांना सामोरं जावं लागतं, असे म्हटले, तर अनेकांनी त्यांच्या विधानावर टीका करत भारतातील कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांसाठी वाढलेल्या संधींकडे त्यांनी दुर्लक्ष केल्याचे मत व्यक्त केले. दुसरी गोष्ट भारतात जिथे महिला काम करतात तिथले वरिष्ठ महिलांविषयी काय विचार करतात किंवा त्यांचं मत काय असू शकतं हे देखील महत्त्वाचे आहे. या एकूणच पार्श्वभूमीवर मला एक किस्सा आठवतो.



महिलांना समान संधी मिळायला हव्यात, याचे सर्वात प्रभावी उदाहरण म्हणजे सुधा मूर्ती यांचा टेल्को अर्थात टाटामधील प्रवेश. हा प्रसंग आजही खासगी कंपनीतील महिलांच्या सक्षमीकरणाचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. सुधा मूर्ती यांनी एका मुलाखतीत सांगितलेला हा किस्सा. टेल्कोने अभियंत्यांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. मात्र, त्या जाहिरातीच्या शेवटी 'महिला उमेदवारांनी अर्ज करू नये' अशी अट नमूद करण्यात आली होती. ही जाहिरात पाहिल्यानंतर सुधा मूर्ती यांनी थेट टाटा समूहाचे तत्कालीन अध्यक्ष जे. आर. डी. टाटा यांना पत्र लिहिलं. त्या पत्रात त्यांनी स्पष्टपणे नमूद केलं की, ङ्गदेशातील जवळपास ५० टक्के लोकसंख्या महिलांची असताना, केवळ लिंगाच्या आधारावर त्यांना नोकरीपासून दूर ठेवणे योग्य नाही. हे पत्र वाचल्यानंतर जे. आर. डी. टाटा यांनी त्यांना मुलाखतीसाठी बोलावलं. मुलाखतीदरम्यान त्यांनी सांगितलं की, ही नियुक्ती जमशेदपूर येथे होती. त्या काळी तेथे बहुतांश कर्मचारी पुरुष होते आणि महिलांसाठी आवश्यक निवास व इतर सुविधा पुरेशा उपलब्ध नव्हत्या, त्यामुळेच ही अट जाहिरातीत टाकण्यात आली होती. मात्र, सुधा मूर्ती यांनी कोणतीही भीती न बाळगता ही नोकरी स्वीकारण्याची तयारी दर्शवली. त्या वेळी त्यांना अमेरिकेत पीएच.डी.साठी जाण्याची संधीही होती. तरीही त्यांनी टेल्कोमध्ये रुजू होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे टेल्कोमध्ये महिला अभियंत्यांसाठी दारे खुली झाली आणि पुढील अनेक महिलांना अभियांत्रिकी क्षेत्रात संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

अमेरिकेनं मला जी संधी दिली ती मला भारतातही मिळाली नसती यावर नूयी यांच्याशी कोणी सहमत आहे, तर कोणी सहमत नाही. पण ज्यावेळी एखादी महिला मग ती त्या पदास लायक असेल, तर तिला त्या पदावर सन्मानानं विराजमान करणारी मानसिकता तिथे जिवंत असणंही तितकंच महत्त्वाचं आहे. सूधा मूर्ती या आपल्या कंपनीत रुजू होण्यास सक्षम आहेत मात्र त्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने टाटा यांनी अधिक विचार केला. ही वैचारिक पातळी आज किती कंपन्यांमधील वरिष्ठांमध्ये असेल. महिला सक्षमच आहेत पण त्याची जाणीव प्रत्येक क्षेत्रातील पुरुषालाही असायला हवी. अर्थात आज नूयी यांनी मांडलेला मुद्दा चुकीचा नाही. महिलांचे नेतृत्व, शिक्षण आणि करिअरविषयी आणि त्यांच्या पदाविषयी बोलायचे तर

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# सुनिल देशमुख यांचे निधन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**चांदस वाठोडा** – येथून जवळच असलेल्या वाठोडा येथील रहिवाशी सुनिल पंजाबराव देशमुख यांचे वयाच्या ५५ व्या वर्षी हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने काल (ता.२४) रात्री ७.४५ ला निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच अनेकांनी त्यांच्या निवासस्थानी जावुन पार्थिवाचे दर्शन घेतले.



त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ३ मुली, भाऊ, बहिण असा आप्तपरिवार असून त्यांच्या पार्थिवावर वाठोडा येथील स्मशानभुमि येथे अत्यसंस्कार करण्यात आले.

# नीटनंतर आता एमपीएससी औषध निरीक्षक भरतीही वादात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – देशभरात गाजलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणानंतर आता महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक भरती प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. भरती प्रक्रियेत गैरप्रकार झाल्याचा आरोप करत दोन उमेदवारांनी पुराव्यांसह महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि अन्न व औषध प्रशासन विभागाकडे लेखी




तक्रार दाखल केली आहे. या संपूर्ण भरती प्रक्रियेची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्याची मागणी तक्रारदारांनी केली आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, २२ मार्च २०२६ रोजी झालेल्या औषध निरीक्षक भरती परीक्षेपूर्वी काही प्रश्न आणि त्यांची उत्तरे व्हॉट्सॲप वर व्हायरल झाली होती. तसेच काही उमेदवारांचे गुण संशयास्पदरीत्या वाढल्याचा आरोप करण्यात आला आहे. गुणपत्रिका आणि अंतिम निवड यामध्येही विसंगती असल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. या प्रकरणात संबंधित व्हॉट्सॲप चॅट, कॉल रेकॉर्ड आणि इतर डिजिटल पुरावे यांची फॉरेन्सिक तपासणी करण्यात यावी, तसेच संपूर्ण भरती प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलच्या दोन विद्यार्थिनी पात्र

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथील वर्ग सातवीच्या विद्यार्थिनी दिव्या आहाके आणि पूर्वा भगत यांनी सातवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ मध्ये पात्र ठरुन शाळेच्या शैक्षणिक यशात मानाचा तुरा रोवला आहे.





या यशाबद्दल मुख्याध्यापक अशोक चौधरी यांनी दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन करुन त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देत त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही कौतुक करण्यात आले.

विद्यार्थिनींच्या या यशामागे त्यांची मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास आणि शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. या यशाबद्दल शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी दिव्या आहाके आणि पूर्वा भगत यांचे अभिनंदन केले.

### ध्रितीस किड्झी आणि ध्रिती ग्लोबल स्कूल येथे

# आषाढी एकादशीचा उत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक ध्रितीस किड्झी आणि ध्रिती ग्लोबल स्कूल येथे आषाढी एकादशीचा उत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमात गौरिश भागवत याने भगवान विठ्ठलाची, ज्ञानेश्वरी झाडे हिने रखुमाईची, कृष्णा अढाऊ याने वासुदेवाची तर प्रियांश सावरकर याने संत तुकाराम महाराजांची भूमिका उत्कृष्टपणे साकारून उपस्थितांची मने जिंकली. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात ज्ञानबा-तुकाराम आणि विठ्ठल-विठ्ठलचा जयघोष करत शाळेच्या परिसरातून भक्तिमय दिंडी (वारी) काढली. परिसरातील नागरिकांनी विठ्ठल-रखुमाईचे पूजन करून विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी आणि वारकरी परंपरेवर आधारित विविध सुंदर सांस्कृतिक नृत्ये सादर केली. विद्यार्थ्यांच्या आकर्षक नृत्यविष्कारांनी आणि भक्तिमय सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. त्यामुळे संपूर्ण शाळेचा परिसर भक्तिरसाने भारावून गेला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची संतपरंपरा, वारकरी संस्कृती, आषाढी वारीचे महत्त्व तसेच भारतीय संस्कृतीतील अध्यात्म आणि भक्तीची परंपरा यांची ओळख करून देण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले.

### अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त

# जनसेवा सप्ताहांतर्गत वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**शेंदुरजनाघाट** – राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या वतीने जनसेवा सप्ताह विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात येत आहे. त्याअंतर्गत शनिवार २५ जुलै २०२६ रोजी निसर्ग सेवा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाअंतर्गत नगरपरिषद शाळा क्र.१, व शाळा क्र.२ तसेच हिंदू स्मशानभूमी येथे विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिक यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्याच्या दृष्टीने वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. केवळ वृक्षारोपण न करता त्यांचे संवर्धन व संगोपन करणे ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या उत्साहाने या उपक्रमात सहभाग नोंदवून पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेतली.

या कार्यक्रमास नगराध्यक्षा सुवर्णा वरखडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते संदीप खडसे, नगरसेवक विशाल सावरकर, राकेश दवंडे, शेख नासिर, इफ्तेखार अहमद, सुनीता उईके, जाकिया बानो, पवन मोघे यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नामदेव कळंबे, सुरेश माळोदे, गौरव गणोरकर, लुकेश वंजारी, हर्षल सरोदे, नाना नवरंग, मोहम्मद अकील, शैलेश विटाळकर, प्रफुल वघाळे, रेखा अढाऊ, लोकेश गोहाड, बाबू दवंडे, दिनेश आमले तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसेवा सप्ताहांतर्गत सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून विविध लोकहिताचे उपक्रम आयोजित करण्यात येत असून, या वृक्षारोपण उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पर्यावरण संवर्धनासाठी केलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत करून आयोजकांचे कौतुक केले.

# आदर्श इंग्लिश कॉन्व्हेंट मध्ये पहिली पालक सभा उत्साहात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – नवयुवक शिक्षण संस्थे अंतर्गत आदर्श इंग्लिश कॉन्व्हेंट मध्ये शाळेच्या सुरुवातीलाच पालक सभेचे आयोजन करण्यात आले.



या पालक सभेमध्ये नर्सरी, के.जी.वन, के.जी.टू चे पालक होते. सर्वप्रथम शाळेच्या शिक्षिका वानखडे यांनी शाळेचा आढावा सांगितला आणि पालक-शिक्षक यांच्यामधील नाते कसे असते? हे आपल्या प्रास्तविकातून सांगितले आणि नंतर शाळेच्या शिक्षिकांना आपला परिचय देण्यासाठी आमंत्रित केले आणि आपला स्वतः चा परिचय देऊन पालकांसोबत संवाद साधला.

या पालक सभेमध्ये मुख्याध्यापिका निता चिमोटे यांनी पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांना मुलांना कसं घडवायचे आणि या जगामध्ये पुढे कसे टिकवायचं यासाठी खूप चांगल्या प्रकारे उदाहरणासह मार्गदर्शन केले. या पालक सभेचे संचालन वानखडे यांनी केले आणि पालक सभेकरिता सिनकर,धार्मिक, काळे यांनी सहकार्य केले.

### जागृत इंग्लिश कॉन्व्हेंट येथे

# आषाढी एकादशी निमित्त भक्तिमय दिंडीचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – जागृत इंग्लिश कॉन्व्हेंट येथे आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त भक्तिमय दिंडीचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी पारंपारिक वारकरी वेशभूषा परिधान करुन या दिंडीमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. दिंडीमध्ये काव्या राकेशिया व हिंदवी शेरेकर यांनी विठ्ठल रुक्मिणी यांची वेशभूषा साकारल्या त्याचबरोबर सर्व विद्यार्थी



वारकरी वेशभूषेमध्ये आले व टाळ मृदुंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा तुकाराम विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणाने दुमदुमुन गेला विद्यार्थ्यांनी भजन टाळ यांचा गजर करुन महाराष्ट्राचा समृद्ध वारकरी परंपरेचे दर्शन घडविले या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृती परंपरा व संतांचे शिकवण्याची ओळख झाली. मुख्याध्यापिका पूजा मांडवगडे, सुपरवायझर धनश्री लाडोळे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने दिंडीला विशेषणा सोबतच संस्कार संस्कृती आणि परंपराची जपवणूक करण्याचा संदेश दिंडीच्या माध्यमातून देण्यात आला.

# 'न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट'मध्ये एकादशीचे औचित्य साधून भक्तिभावाचा एक अनोखा सोहळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – आषाढी एकादशीचे औचित्य साधून स्थानिक नामांकित सी.बी.एस.ई.स्कूल 'न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट'मध्ये भक्तिभावाचा एक अनोखा सोहळा अनुभवायला मिळाला.





कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत मंगलमय वातावरणात झाली. प्राचार्या माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर,पी.आर.ओ .किशोर देशमुख, प्री.प्रायमरी विभाग प्रमुख पराग भोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत विठ्ठल-रखुमाईच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अत्यंत श्रद्धेने आणि रीतसर आरती करून या विलोभनीय सोहळ्याचा प्रारंभ झाला. या संपूर्ण उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे विद्यार्थ्यांनी काढलेली बाल दिंडी आणि सादर केलेला रिंगण सोहळा.



या सोहळ्याचे मुख्य आणि सर्वात आकर्षक केंद्रबिंदू म्हणजे इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला 'रिंगण सोहळा' हा ठरला. सर्व विद्यार्थी वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेत शाळेत आले होते. मुलांनी परिधान केलेले धोती-कुर्ता, डोक्यावर टोपी, कपाळावर अष्टगंध-बुक्का आणि मुलींनी नऊवारी साडी नेसून डोक्यावर घेतलेली तुळशीची वृंदावने सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. हातात टाळ, मृदंग आणि भगव्या पताका घेऊन चिमुकल्यांनी जेव्हा मैदानावर शिस्तबद्ध रिंगण धरले आणि विठ्ठलाच्या नामाचा गजर केला, तेव्हा उपस्थित सर्व पालकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल', 'ज्ञानोबा माउली तुकाराम' या जयघोषाने आणि बालवारकऱ्यांच्या टाळ्यांच्या कडकडाटाने संपूर्ण शाळा परिसर दुमदुमून गेला होता. विद्यार्थ्यांनी यावेळी विठ्ठलाच्या विविध अभंगांवर सुंदर आणि भक्तिमय सादरीकरण केले. हा नयनरम्य सोहळा अनुभवण्यासाठी पालकांनी शाळेत प्रचंड गर्दी केली होती. अनेक पालकांनी या अभूतपूर्व क्षणांचे कौतुक करत विद्यालयाच्या या उपक्रमाचे मनापासून आभार मानले. शालेय संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव शाम खंडेलवाल, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया आणि सदस्य विनय यावलकर या सर्वच मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक केले तसेच विद्यार्थी, शिक्षक व पालकांना आषाढी एकादशीच्या मंगलमयी शुभेच्छा दिल्या.

प्राचार्या माधुरी भोंडे आणि समन्वयक श्वेता गणोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. या भव्य सोहळ्याला यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# मेळघाटातील कुपोषण नियंत्रण करण्यासाठी उपाययोजना करणार : महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**अमरावती** – मेळघाटातील चिखलदरा आणि धारणी तालुक्यातील कुपोषणाचा प्रश्न गंभीर आहे. याबाबत शासन सकारात्मक पावले उचलत असून गेल्या काळात कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे. येत्या काळातही माता आणि बाल संगोपनासाठी विविध उपयोजना करण्यात येऊन मेळघाटातील कुपोषण नियंत्रित करण्यावर भर देण्यात येईल, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिली.



धारणी येथील तहसील कार्यालयात मेळघाटातील विविध प्रश्नाबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी प्रभुदास भिलावेकर, उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, महिला बालविकास उपायुक्त विलास मसराळे आदी उपस्थित होते.

तटकरे म्हणाला, मेळघाटात काही प्रमाणात बालविवाहाची समस्या आहे. त्यामुळे कमी वयात मातृत्व येत असल्याने कुपोषित बालके जन्माला येण्याची शक्यता असते. यावर उपाययोजना म्हणून बालविवाहासोबतच मातांना पोषक आहार मार्गदर्शनासाठी महिला सेविकेची निवड करून तिला प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या सेविकेमार्फत आदिवासींना समजेल अशा भाषेत आरोग्यविषयक माहिती देण्यात येणार आहे. तसेच बाळ जन्माला आल्यानंतर १ हजार दिवसांच्या आहाराचे नियोजन करण्यात येणार आहे. शासनाच्या या उपाययोजनांमुळे कुपोषित बालके जन्माला येण्यापासून बचाव होणार आहे.

मेळघाटातील अंगणवाडी स्मार्ट करण्यासाठी विजेच्या सोयीसाठी सोलार, स्वच्छतागृह आणि शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. याठिकाणी गरोदर मातांना देण्यात येणारा आहार त्यांनी त्याच ठिकाणी घ्यावा, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. दर्जेदार आहार मिळण्यासाठी आहार समिती सक्रिय करावी. यामध्ये समाजातील विविध घटकांचा समावेश करावा. जिल्हा नियोजनच्या निधीमधून अंगणवाडी बांधकामासाठी मिळणारा निधी एक वर्षाच्या आत खर्च करावा. खर्च करणे शक्य नसल्यास बांधकाम विभागाला एजन्सी म्हणून नेमून कामे तातडीने पूर्ण करावीत.

आदिवासींच्या मनात आरोग्य यंत्रणेबद्दल गैरसमज आहेत. ते दूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. तसेच रुग्णालयात होणाऱ्या प्रसुतींमध्ये नैसर्गिक प्रसुती होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. त्यामुळे आदिवासींना सिजरची असणारे भीती कमी होण्यास मदत होईल. महिला आणि आदिवासींकरिता असलेल्या योजनांची माहिती ग्रामसभेमधून देण्यात यावी. महिलादिनी होणाऱ्या ग्रामसभेत प्रामुख्याने महिलांच्या योजना सांगण्यात याव्यात. मेळघाटातील कुपोषणाच्या बाबतीत मध्यम तीव्र कुपोषण आणि गंभीर तीव्र कुपोषण हे दोन्ही घटक महत्त्वाचे आहेत.

आजच्या दौऱ्यादरम्यान श्रीमती तटकरे यांनी भोकरबर्डी, धुळघाट, कळमखार, लवादा आणि चित्री येथे अंगणवाडी केंद्रांना भेट दिली. तसेच बालके आणि आदिवासी समूहाशी संवाद साधला.

# तुकाराम मुंढ्यांच्या धडक कारवाईला न्यायालयाचा मोठा झटका

## ‘त्या’ दूध डेअरींवरील कारवाईला स्थगिती

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – राज्यभरात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली दूध भेसळीविरोधात धडक मोहीम सुरू आहे. मात्र, या धडक कारवायांवर आता मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने गंभीर प्रश्न उपस्थित करत एफडीएला मोठा झटका दिला आहे. तपासणीनंतर नियमानुसार सुधारणेसाठी १४ दिवसांची मुदत न देता थेट परवाने निलंबित केल्याचा आरोप करत दाखल झालेल्या



याचिकांवर सुनावणी करताना न्यायालयाने ८ दूध डेअरींवरील कारवाईला अंतरिम स्थगिती दिली आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, जळगाव आणि अहिल्यानगरमधील डेअरींना हा दिलासा मिळाल्याने एफडीएच्या कायदेशीर प्रक्रियेवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दररोज हजारो लिटर दूध संकलन करणाऱ्या या डेअरींशी जोडलेले हजारो शेतकरीही या निर्णयाकडे आशेने पाहत आहेत. कोणत्या ८ कारवायांना हायकोर्टाची स्थगिती? १.छत्रपती संभाजीनगर: शिवकृपा डेअरी २.अहिल्यानगर: कृष्णानंद फूड प्रॉडक्ट ३. अहिल्यानगर: जतिन दूध संकलन ४.अहिल्यानगर: जयहरी दूध संकलन ५.जळगाव: सरस्वती मिल्क प्रॉडक्ट ६.अहिल्यानगर: सिद्धेश्वर मिल्क प्रॉडक्ट ७.जालना: सरस्वती मिल्क प्रॉडक्ट एफडीएच्या नियमांनुसार आणि आयुक्तांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, दूध डेअरीच्या तपासणीत त्रुटी आढळल्यास त्या दूर करण्यासाठी संबंधित व्यावसायिकाला १४ दिवसांची मुदत देणे बंधनकारक आहे.

## स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राकाँ पक्षाचे वतीने

# २७ व २८ जुलै रोजी जनसेवा सप्ताहाचे आयोजन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरूड** – महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने २७ व २८ जुलै रोजी जनसेवा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे.



माजी आमदार देवेंद्र भुयार यांचे मार्गदर्शन राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत रक्तदान शिबिर, वृक्षसेवा तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोफत काठी वाटप असे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. येत्या २७ जुलै रोजी सकाळी १० वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय, बस स्टँडसमोर वरुड येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले असून रक्तदात्यांना भेटवस्तु म्हणुन हेल्मेट देण्यात येणार आहे. २८ जुलै रोजी सकाळी १० वाजता गुरुदेव प्रार्थना मंदिर, वरुड येथे वृक्षसेवा व ज्येष्ठ नागरिकांना मोफत काठी वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमासाठी पूर्वनोंदणी केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना काठ्यांचे मोफत वितरण करण्यात येणार आहे.

या जनसेवा सप्ताहात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सामाजिक उपक्रमांना सहकार्य करावे, असे आवाहन तारेश देशमुख ८३२९२४०९८२, युवराज आंडे ९४२२१५७७५६, अन्सार बेग ९८६०८१४४१५, श्याम आजणकर ९६८९४५९४२०, अमित देवते ९४२१५७७०५७, निखिल बनसोड ९५६१२४७७०५, जगबीरसिंग भावे ८३०८५०३४९०, नझीम काझी ९८६०११९१२२, अजहर काझी ९०९६६८२६६० यांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

## मेळघाटात आदिवासी विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ

# टिंटबानंतर आता बिजुधावडी आश्रमशाळेत ५० विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**अमरावती** – अमरावतीच्या मेळघाट भागातील आश्रम शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी गंभीर खेळ सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.

शनिवारी टिंटबा येथील आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याची घटना ताजी असतानाच, रविवारी बिजुधावडी येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत ४० ते ५०



विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाच्या जेवणामुळे विषबाधा झाली आहे. विशेष म्हणजे राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके हे स्वतः रविवारी दुपारपासून धारणी आणि टिंटबा भागाच्या दौऱ्यावर असतानाच ही दुसरी मोठी घटना घडल्याने सर्वत्र तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

टेंबली सेंट्रल किचनमधून आलेले शिळे अन्न कारणीभूत? टिंटबा आणि बिजुधावडीसह परिसरातील इतर तीन आश्रमशाळांना दररोजचे जेवण हे ‘टेंबली’ येथील मध्यवर्ती स्वयंपाकघरातून पुरवले जाते. शनिवारी विद्यार्थ्यांना अत्यंत निकृष्ट आणि शिळे अन्न पुरवण्यात आल्याचा आरोप पालकांनी आणि स्थानिकांनी केला होता. रविवारीदेखील त्याच सेंट्रल किचनमधून जेवण पुरवण्यात आले आणि ते खाल्ल्यानंतर विद्यार्थ्यांना मळमळ, उलट्या व पोटदुखीचा त्रास सुरू झाला. यावरून मध्यवर्ती स्वयंपाकघरातील अन्न शिजवण्याच्या पद्धतीवर आणि गुणवत्तेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

बिजुधावडी रुग्णालयात उपचार सुरू विषबाधा झालेल्या ४० ते ५० विद्यार्थ्यांना तात्काळ बिजुधावडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणि रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातून रुग्णवाहिका आणि इतर वैद्यकीय पथके तात्काळ बिजुधावडीकडे रवाना करण्यात आली असून विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत.

# सिग्नलवरील प्रतीक्षा अवधी १५ सेकंदांवर येणार

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**ठाणे** – ठाणे शहरातील सर्वाधिक वदर्ळीच्या तीन हात नाका चौकातील वाहतूककोंडी दूर करण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या महत्त्वाकांक्षी वाहतूक सुधारणा प्रकल्पासह विविध विकासकामांचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले.

हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर येथे सिग्नलवर थांबण्याचा कालावधी सध्याच्या प्रदीर्घ प्रतीक्षेऐवजी अवघ्या १५ सेकंदांपर्यंत कमी होईल. यावेळी विकासकामे उद्घाटनाच्या प्रतीक्षेत न ठेवता ती वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या.

एमएमआरडीए आणि ठाणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधताना शिंदे म्हणाले की, पायाभूत सुविधा प्रकल्पांना अधिक गती देण्यासाठी ’ॲक्सेलरेटरवर पाय’ ठेवण्याची गरज आहे.

# देवेंद्र भुयार यांचे मतदारसंघात नव्या दमाने ‘पुनरागमन’

## अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधत विविध कार्यक्रमांचे आयोजन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरूड** – माजी आमदार देवेंद्र भुयार यांच्या मतदारसंघातील राजकीय हालचालींना पुन्हा वेग आला असून त्यांच्या नव्या राजकीय सक्रियतेची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. विविध गावांतील कार्यकर्त्यांच्या बैठका, जनसंपर्क दौरे आणि नागरिकांशी वाढता संवाद यामुळे देवेंद्र भुयार यांचे मतदारसंघात नव्या दमाने ‘पुनरागमन’ होत असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.

अलीकडील काळात देवेंद्र भुयार यांनी मतदारसंघातील विविध विकासकामांचा आढावा घेत नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यास सुरुवात केली आहे. युवक, शेतकरी, व्यापारी आणि महिला बचत गटांशी संवाद साधत त्यांनी पुन्हा जनतेमध्ये सक्रिय होण्याचा संदेश दिला आहे.कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, देवेंद्र भुयार यांनी आमदार असताना अनेक विकासकामे केली होती. आता पुन्हा त्याच जोमाने



मतदारसंघात सक्रिय होत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या या सक्रियतेकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, विरोधकांकडूनही या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवले जात असून आगामी काळात मतदारसंघातील राजकीय समीकरणे अधिक रंगतदार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधत माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी मतदारसंघात नव्या जोमाने जनसंपर्क अभियानाला सुरुवात केली असून, त्यांच्या या सक्रियतेला कार्यकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे भुयार यांच्या राजकीय पुनरागमनाची चर्चा संपूर्ण मतदारसंघात रंगू लागली आहे. या निमित्ताने विविध ठिकाणी कार्यकर्त्यांच्या बैठका, नागरिकांशी संवाद तसेच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यकर्त्यांनी यावेळी माजी आमदार देवेंद्र भुयार यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत आगामी काळात अधिक ताकदीने संघटन उभारणी करण्याचा निर्धार व्यक्त केला. अजित पवार यांच्या विचारांवर चालत विकासाभिमुख राजकारण करण्याची भूमिका यावेळी मांडण्यात आली. भुयार यांच्या या सक्रियतेमुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील राजकीय वातावरण अधिक तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५९४/२०२६** **ने.ता.२५/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) आशाबाई महादेवराव बेलसरे, वय अं.७० वर्ष, धंदा-गृहिणी, रा.अमरावती, ता.जि.अमरावती, २) नरेंद्र देवरावजी वरखेडकर, वय अं.५२ वर्ष, धंदा- मजुरी, ३) सौ.निर्मला सुधाकरराव टेंभे वय अं.६५ वर्ष, धंदा- गृहिणी, ४) सौ.संगिता संजयराव कविटकर, वय अं.५० वर्ष, धंदा- गृहिणी, क्र.२ ते ४ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, ५) सौ.जया राजेंद्र लंगडे, वय अं.३५ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.शिरजगांव मोझरी, ता.तिवसा, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत देवराव भगवानजी वरखेडकर व मयत मंजुळाबाई देवरावजी वरखेडकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२५/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख २३/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# ‘इंडियन आयडल १६’ची विजेती ठरली ज्योतिर्मयी नायक

## ट्रॉफीसह मिळालं २० लाखांचं रोख बक्षीस, चाहत्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – नऊ महिने, शेकडो सुमधुर गाणी, प्रचंड टाळ्यांचा कडकडाट आणि असंख्य प्रार्थनांनंतर, ‘इंडियन आयडॉल’ सीझन १६ ला अखेर आपला नवा विजेता मिळाला आहे. ओदिशाहून आलेल्या ज्योतिर्मयी नायक हिनं शानदार विजय मिळवत ‘इंडियन आयडॉल’ १६ ची ट्रॉफी आपल्या नावे केली आणि २० लाख रुपयांचं



बक्षीसही जिंकलं. ग्रँड फिनालेमधील तिच्या दमदार परफॉर्मेंसनं उपस्थितांना मंत्रमुग्ध केलं. दरम्यान, जबलपूरचा तनिष्क शुक्ला हा स्पर्धेत 'फर्स्ट रनर-अप' ठरला. ‘सैयां ओ सैयां’ गाऊन जिंकली देशाची मनं

ग्रँड फिनालेमध्ये ज्योतिर्मयी हिनं 'सैयां ओ सैयां' हे गाणं अतिशय भावपूर्णरीत्या परफॉर्मे केलं, ज्यामुळे संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटानं दुमदुमून गेलं. त्यानंतर तिला विजेती म्हणून घोषित करण्यात आलं आणि तिच्या आनंदाला पारावार उरला नाही. अंशिका चोनकर, मनराज वीर सिंह, मस्कम्मे बोसू, सुहेल सुफी आणि तनिष्क शुक्ला यांसारख्या तगड्या स्पर्धकांना मागे टाकत तिनं ही ट्रॉफी जिंकली आणि त्यावर स्वतःचं नाव कोरलं. फक्त ‘इंडियन आयडॉल’ नाही... ओदिशाची प्रसिद्ध गायिका ज्योतिर्मयी नायक ज्योतिर्मयी नायक हे नाव ओदिशा म्युझिक इंडस्ट्रीसाठी काही नवं नाही. पण, तिची ओळख फक्त गाण्यांपुरतीच मर्यादित नाही.

# आता पैशामुळे शस्त्रक्रिया थांबणार नाहीत

## मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नागपूर** – आजार कितीही गंभीर आणि मोठा असला तरी केवळ पैसे नाही म्हणून गरीबांचे उपचार थांबू नये, यासाठी राज्य शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध केला आहे.

येथे आयोजित महाआरोग्य शिबिर हे गरीब रुग्णांसाठी एक वरदान असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे धनवटे नॅशनल कॉलेजच्या प्रांगणात आयोजित महाआरोग्य शिबिरात रविवारी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. फिरता दवाखाना, रुग्णवाहिका यांचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यानंतर दिव्यांगांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते व्हील चेअरचे वितरण करण्यात आले. अनेक संस्थांतर्फे मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी तसेच गंगाधरराव फडणवीस स्मृती डायग्नोस्टिक सेंटरला देणगी आणि रुग्णवाहिका प्रदान करण्यात आली. हे सर्व दाते तसेच महाशिबिराच्या आयोजनात सहभागी डॉक्टरांचा सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला.

समाजातील शेवटच्या घटकाला आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्या हाच या शिबिराचा उद्देश असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्वांना आरोग्य सुविधा मिळाव्या यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय राज्य शासनाने घेतले. रुग्णालयांची संख्या वाढवली.

राज्य सरकारच्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेत या आधी जे गंभीर आजार नव्हते, ते समाविष्ट केले. गेल्या दीड वर्षात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षातर्फे ५७ हजार रुग्णांना ४५२ कोटी रुपये उपचारांसाठी उपलब्ध करून दिले.

### दिनविशेष

१९४९ : जगातील पहिल्या प्रवासी जेट विमान, डी हॅविललॅड कॉमेटचे पहिले उड्डाण.

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१४५८६० रु.(१०ग्रॅम)
२२.कॅ सोने -१३३७०० रु.(१०ग्रॅम)
चांदी - २,४४,४३० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी | १६५० | २००० |
| गहू | २५०० | ३००० |
| तूर | ६१०० | ६३९० |
| मूग | ६५०० | ७००० |
| उडीद | ६००० | ७००० |
| हरभरा | ५६०० | ५९०० |
| सोयाबिन | ४१०० | ४३५० |
| बाजरा | २००० | २३०० |
| तिळ | ८२०० | ९३०० |
| भुईमूग | ५१५० | ५३५० |
| मका | २२०० | २३०० |

# बसस्थानक शेडच्या छताचा भाग कोसळुन महिला जखमी

## घटनास्थळाला माजी आमदार देवेंद्र भुयार यांची भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील बसस्थानकावर आज सकाळी एक धक्कादायक दुर्घटना घडली. बसची प्रतीक्षा करत असलेल्या प्रवाशांवर बसस्थानक शेडच्या छताचा काही भाग अचानक कोसळल्याने एक महिला प्रवासी गंभीर जखमी झाली. घटनेनंतर बसस्थानक परिसरात एकच गोंधळ उडाला. उपस्थित नागरिकांनी तातडीने धाव घेत जखमी सिमा कुरवाळे (३५) रा.सावंगी या महिलेला ढिगाऱ्यातून बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.



प्राप्त माहितीनुसार, छताचे प्लास्टर आणि काँक्रीटचा मोठा भाग अचानक खाली पडल्याने ही दुर्घटना घडली. सुदैवाने त्यावेळी त्या ठिकाणी मोठी गर्दी नसल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, या घटनेमुळे बसस्थानकावरील प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच संबंधित अधिकारी, स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. दुर्घटनेचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू करण्यात आला असून बसस्थानकाच्या ईमारतीची सुरक्षितता तपासण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

> “ ही घटना घडताच माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी घटनास्थळाचा भेट देत जखमी महिलेची विचारपूस करीत आगार व्यवस्थानकांची भेट घेत आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. वरुड बसस्थानक नव्याने निर्माण करण्याची प्रक्रिया मी माझ्या काळात पुर्ण केली होती परंतु ती कुठे थांबली? हे कळायला मार्ग नसल्याचे सांगत तातडीने हे बांधकाम सुरु करण्याची मागणी केली.

स्थानिक नागरिकांनी बसस्थानकाच्या इमारतीची नियमित दुरुस्ती व देखभाल होत नसल्याचा आरोप केला आहे. अनेक ठिकाणी छताला तडे गेले असून प्लास्टर निखळत असल्याच्या तक्रारी यापू-र्वीही करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या दुर्घटनेनंतर प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेची सखोल चौकशी करुन जबाबदारांवर कारवाई करावी, तसेच बसस्थानकातील धोकादायक भाग तातडीने दुरुस्त करुन भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# अल्पवयीन मुलीशी लग्न अन लैंगिक अत्याचार

## मोर्शी पोलीस ठाण्यात तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**हिवरखेड** – अल्पवयीन असल्याचे माहित असतानाही मुलीशी प्रेमसंबंध ठेवून तिच्याशी विवाह करणे आणि शारीरिक संबंध प्रस्थापित करणे एका तरुणाला चांगलेच महागात पडले आहे. या प्रकरणी मोर्शी पोलीस ठाण्यात एका २० वर्षीय तरुणाविरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह (पोक्सो) विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, प्रज्वल सुभाष पाचारे (वय २०) रा. हिवरखेड असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपी तरुणाचे नाव आहे. सुमारे एक वर्षापूर्वी पुसला येथे पीडित अल्पवयीन मुलगी आणि आरोपी प्रज्वल यांची ओळख झाली होती. या ओळखीचे रूपांतर पुढे प्रेमात झाले. जानेवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यात आरोपीने मुलीच्या आजोबांच्या घरी तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर दोघांनी लग्नाचा निर्णय घेतला आणि २५ जानेवारी २०२६ रोजी स्वमर्जीने विवाह केला. काही दिवसांनंतर पीडित मुलीला त्रास होऊ लागल्याने तिच्या सासूने तिला ग्रामीण रुग्णालय मोर्शी येथे सोनोग्राफीसाठी नेले. तेथे डॉक्टरांनी तपासणी केली असता ती ५ महिन्यांची गरोदर असल्याचे निष्पन्न झाले.

मुलगी अल्पवयीन असल्याचे माहित असतानाही तिच्याशी लग्न करुन शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याप्रकरणी मोर्शी पो-लीस ठाण्यात बीएनएस कलम ६४(१) सह बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ आणि ६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

